ePaper

**विधान परिषदेच्या 4 जागांसाठी निवडणूक, ठाकरे गटाकडून दोघांना संधी**



|| वर्ष - 7 | अंक - 335 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 26 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक!
- वड्याचं तेल वांग्यावर!
- शिंदे बंगल्यावर बसून पहारा देतायत
- हार्दिक पंड्याच्या घटस्फोटाच्या चर्चा!


## अनधिकृत होर्डिंगनंतर आता

# मोबाइल टॉवर रडारवर!

### शहरात विविध कंपन्याचे 923 मोबाइल मनोरे, 533 मनोरे अधिकृत, 390 मनोरे अनधिकृत

| पिंपरी | महाईन्यूज

**महापालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणात शहरात विविध कंपन्याचे ९२३ मोबाइल मनोरे (टॉवर) असल्याचे समोर आले. त्यात ५३३ मनोरे अधिकृत तर ३९० मनोरे अनधिकृतपणे उभे आहेत. होर्डिंग दुर्घटनेनंतर या अनधिकृत मोबाइल मनोऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**





तंत्रज्ञानाचा दिवसेंदिवस वापर वाढला असतानाच पिंपरी-चिंचवड शहरात मोबाइल मनोऱ्यांची संख्याही झपाट्याने वाढली आहे. मोबाइल, इंटरनेट नेटवर्किंगचा वापर वाढला असल्याने कंपन्यांनी शहरातील विविध भागांतील इमारतींवर आणि नागरी वस्तीत मोबाइल मनोरे उभारले आहेत. महापालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणात विविध कंपन्यांचे ९२३ मोबाइल मनोरे शहरात असल्याचे समोर आले. त्यात ५३३ अधिकृत तर ३९० मनोरे अनधिकृतपणे उभे आहेत. महापालिकेला शासनाच्या धोरणामुळे नामवंत कंपन्यांच्या मोबाइल मनोऱ्यांवर कोणतीही कारवाई करता येत नाही. तसेच काही मोबाइल मनोऱ्यांची करसंकलन विभागाकडून कर आकारणी देखील केलेली नाही. तर, काही कंपन्या मोबाइल मनोऱ्यांवर लावलेल्या कर आकारणी विरोधात न्यायालयात गेल्या आहेत. त्यामुळे अनधिकृत मोबाइल मनोरे उभारून कंपन्याकडून कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय केला जात आहे. होर्डिंग दुर्घटनेनंतर अनधिकृत मोबाइल मनोरे देखील चर्चेत आले आहेत. अनधिकृत मोबाइलच्या लोखंडी मनोऱ्यांपासून देखील होर्डिंगसारखा धोका संभवतो.

**कारवाईचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणार**

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले, की मोबाइल मनोऱ्यांबाबत बैठक झाली आहे. मनोरे उभारलेल्या कंपन्यांना स्थापत्यविषयक लेखापरीक्षण करण्यास सांगितले आहे. मनोरा आणि इमारतीच्या मजबुतीसंदर्भात स्थापत्यविषयक स्थिरता प्रमाणपत्र सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार १५ दिवसांच्या मुदतीत पूर्तता करणे अपेक्षित आहे. तसे न केल्यास मोबाइल मनोऱ्यांवर कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल. शासनस्तरावर मोबाइल मनोऱ्यांवरील कारवाईचे अधिकार आहेत.

## मोदी लाटेचा महाराष्ट्राच्या निवडणुकीवर किती परिणाम?

### लोकसभा निवडणुक राज्यातील राजकीय समीकरणांवर लढली गेली : श्रीमंत माने

| मुंबई |
महाईन्यूज | प्रतिनिधी |



लोकसभा निवडणुकीचं महाराष्ट्रातील मतदान झालं आहे. देशातील सहाव्या टप्प्यातील मतदान आज झालं. आणखी एका टप्प्यातील मतदान झालं की चार जूनला निकाल लागणार आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात कोणत्या मुद्द्यांची सर्वाधिक चर्चा झाली? यावर राजकीय विश्लेषक श्रीमंत माने यांनी भाष्य केलंय. राष्ट्रीय पातळीवर मोठा मुद्दा नाही. लोकसभा निवडणुक असली तरी राज्यातील राजकीय समीकरणांवर लढली गेली आहे, असं श्रीमंत माने यांनी म्हटलं आहे. तसंच यंदाच्या निवडणुकीवर मुद्द्यांवरही श्रीमंत माने यांनी भाष्य केलंय.

शिवसेना राष्ट्रवादी फुटणे, एकनाथ शिंदे- अजित पवार भाजपसोबत असणं, या गोष्टींचा या निवडणुकीवर परिणाम झाला. पक्ष फुटीचा राज्यातील विषयावर आधारित ही निवडणूक झाली त्याचा परिणाम दिसला. मोदी लाट महाराष्ट्रामध्ये दिसली नाही. महाराष्ट्राची निवडणूक ही स्थानिक बाबीवर झाली. महायुती आणि मविआमध्ये तुल्यबळ निवडणूक झाली, असं श्रीमंत माने म्हणाले.

**कुणाला किती जागा मिळण्याचा अंदाज?**

महाराष्ट्रकडे देशाचा लक्ष लागण्याचं कारण म्हणजे दक्षिण भारत आणि उत्तर भारताचा मधला भाग महाराष्ट्र... भाजपची घट भरून काढणारी दोनच राज्य महाराष्ट्र आणि कर्नाटक आहेत. महाराष्ट्रचा निकाल हा देशासाठी भाजपसाठी निर्णायक असा असेल. महाराष्ट्रामध्ये 22-24 जागा महायुतीला तर 24 ते 26 मविआला जागा मिळतील. किमान दोन जागांनी मविआ पुढे राहील, असं श्रीमंत माने यांनी म्हटलं.

## पुण्यातील पब संस्कृती विरोधात

# महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक!

### हिट अँड रन प्रकरणामुळे पब संस्कृती पुन्हा एकदा सापडली वादात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील पब संस्कृती विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. यासाठी मनसेकडून एक सही संतापाची आंदोलन सुरु आहे. पुण्याच्या गुडलक चौकात मनसेकडून आंदोलन सुरू आहे. हिट अँड रन प्रकरणामुळे पब संस्कृती पुन्हा एकदा वादात सापडली आहे. त्यामुळे मनसेने याविरोधात आंदोलन केले आहे.**



पुण्यातील हिट अँड रन प्रकरण चर्चेत आल्यामुळे वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने एका दुचाकीला धडक दिल्याने दोन जण जागीच ठार झाले होते. मुलगा अल्पवयीन असल्याने त्याला लगेचच जामीन मिळाला होता. पण त्यानंतर लोकांनी नाराजी व्यक्त केली. हे प्रकरण चर्चेत आल्याने दबाव वाढला. खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याची दखल घेतली.

या प्रकरणात मुलगा, वडील आणि आजोबा असे तिघे ही जण सध्या तुरुंगात आहेत. मुलगा अल्पवयीन असताना देखील त्याला गाडी दिल्याने वडिलांवर गुन्हा दाखल झाला आहे. वडील विशाल अग्रवाल हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. दुसरीकडे आजोबांनी हा गुन्हा आपल्या अंगावर घ्यावा म्हणून त्यांच्या ड्राईव्हरवर जबरदस्ती केली आणि त्याला दोन दिवस डांबून ठेवल्याने सुरेंद्र अग्रवाल यांना देखील अटक झाली असून कोर्टाने त्यांना २८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. कल्याणीनगर पुणे अपघाताच्या पार्श्वभूमीवर गेल्या तीन दिवसात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहिमेत शहरातील तसेच जिल्ह्यातील 49 पब आणि बारवर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात केले आहेत. त्यातील बरेच पब आणि बार बंद करून सील करण्यात आले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत यांनी सांगितले की, कल्याणी नगर अपघाताच्या घटनेनंतर 49 पब आणि बारवर कारवाई करण्यात आलीये. घटनेच्या आधी एप्रिल आणि मे महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने 57 पब आणि बार वर कारवाई करण्यात आली होती. गेल्या वर्षभरात 257 ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. तसेच या कारवाई मध्ये 1 कोटी 12 लाख रुपयांच दंड देखील वसूल करण्यात आला आहे. विना परवाना मद्य विक्री करणाऱ्या पब आणि बार वर कारवाई करण्यात येत असून ही कारवाई अशीच पुढे चालू राहणार असल्याचं यावेळी त्यांनी सांगितल.

#### पुणे जिल्ह्यातील 49 पब आणि बारवर कारवाई

कल्याणीनगर पुणे येथील अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून मागील तीन दिवसात 14 पथकांमार्फत राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेत शहरातील तसेच जिल्ह्यातील 49 पब आणि बार वर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात आले असून ते बंद करून सील करण्यात आले आहे.याबाबतची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत यांनी दिली. कल्याणी नगर येथील अपघातानंतर जवळपास 49 पब आणि बार वर कारवाई करण्यात आली आहे.या घटनेच्या पूर्वी देखील एप्रिल आणि मे महिन्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने 57 पब आणि बार वर कारवाई करण्यात आली होती. तसेच गेल्या वर्षभरात 257 ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.तसेच या कारवाई मध्ये 1 कोटी 12 लाख रुपयांच दंड देखील वसूल करण्यात आलं आहे, असं चरणसिंग राजपूत म्हणाले.

---

## पूररेषेच्या हद्दीत बांधकामांसाठी अधिकाऱ्यांनी पैसे घेतले?

### नावासह तक्रार करावी, योग्य ती कारवाई केली जाईलः आयुक्त शेखर सिंह

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोशी, बोऱ्हाडेवाडी परिसरात इंद्रायणी नदी पात्रालगतच्या पूर प्रतिबंधक रेषेच्या (निळी) हद्दीतील बांधकामांसाठी महापालिका अधिकाऱ्यांनी पैसे घेतल्याचा आरोप महिलांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणात महापालिकेच्या कोणत्या, अधिकाऱ्यांनी पैसे घेतले आहेत, त्यांची नावासह तक्रार करावी, योग्य ती कारवाई केली जाईल, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले.**



मोशीतील बोऱ्हाडेवाडीत इंद्रायणी नदी पात्रालगतचा भूखंड रहिवाशी भाग असल्याचे भासवून आणि त्याची जाहिरात करून २० ते २५ लाख रुपये गुंठ्याने नागरिकांना जागेची विक्री केली. शहरातील कामगार, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांनी जागा घेऊन घरे बांधली. परंतु, पूर रेषेत अनधिकृतपणे बांधकाम होत असताना महापालिका अधिकाऱ्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केले. पूर रेषेतील अतिक्रमण, अनधिकृत बांधकामांमुळे नदीचे पात्र अरुंद होवू लागले होते. याबाबत हरित लवादाकडे तक्रार करण्यात आली होती. परंतु, लवादाचे आदेश येण्यापूर्वीच महापालिकेने अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली.

पूर रेषेतील बांधकामांसाठी अधिकाऱ्यांना पैसे दिल्याचा आरोप महिलांनी केला. 'आम्ही मोलमजुरी करून जगणारी सर्वसामान्य कुटुंबे आहोत. तुम्ही घरे बांधा नंतर ती महापालिकेत नियमानुसार होतील', असे आम्हाला जागा घेताना सांगण्यात आले. नंतर महापालिकेच्या नोटिसा येण्यास सुरुवात झाली. महिन्यापूर्वी महापालिकेची काही माणसे आली. त्यांनी आम्हाला वीस लाख रुपये द्या, तुमच्या घराच्या विटेलासुद्धा कोणी हात लावणार नाही, असे सांगितले. आम्ही मंगळसूत्र विकले, घरातील सोने गहाण ठेवले आणि महापालिकेच्या त्या माणसांना गुढीपाडव्याच्या दिवशी वीस लाख रुपये नेऊन दिले. आता आमच्या घरावर बुलडोझर फिरला. आम्ही दाद कोणाकडे मागायची, अशी कैफियत बोऱ्हाडेवाडी येथील पूर रेषेतील अनधिकृत बांधकामावर कारवाई झाल्यानंतर महिलांनी मांडली.

#### तर नागरिकांनी नावासह तक्रार करावी

पूर रेषेतील अनधिकृत बांधकामांवर नियमाप्रमाणे कारवाई झाली आहे. बांधकाम धारकांना यापूर्वीच नोटिसा दिल्या होत्या. त्यानुसार १० एप्रिल रोजी या बांधकामांवर कारवाई केली जाणार होती. निवडणुकीमुळे पोलीस बंदोबस्त मिळाला नाही. त्यानंतरही वेळोवेळी सूचना करूनही बांधकामे सुरूच ठेवली होती. कोणत्याही अधिकारी, कर्मचारी यांनी अतिक्रमण बाधितांकडून पैसे घेतले नाही. जर घेतले असतील तर नागरिकांनी नावासह तक्रार करावी, असे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर म्हणाले.


# लोकसंवाद : मालमत्तांचे सर्वेक्षण

# ‘रेड झोन’मुक्त पिंपरी-चिंचवडसाठी ‘फस्ट स्टेप’!

## मिळकतधारकांची दिशाभूल नको; वस्तुस्थिती समजून घ्या!

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकाम, शास्तीकर, प्राधिकरण परतावा आणि रेड झोन असे तीन स्थानिक मुद्दे राजकारणाचा केंद्रबिंदू राहिले आहेत. २०१४ मध्ये भाजपा सत्ताकाळात याच मुद्यावर पिंपरी-चिंचवडकरांनी सत्ता परिवर्तन केले. २०१७ मध्ये महापालिकेतही भाजपा लोकांनी पसंती दिली. पिंपरी-चिंचवडकरांना दिलेल्या आश्वासनांना कटिबद्ध राहुन यापैकी अनधिकृत बांधकाम (1 हजार चौ.फुटापर्यंतची बांधकामे नियमित झाली), संपूर्ण शास्तीकरमाफीचा ऐतिहासिक निर्णय झाला. यासह नवनगर प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांच्या साडेबारा टक्के परताव्याचा प्रश्नही सुटला. आता ‘रेड झोन’ चा तिढा सुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. पण, पिंपरी-चिंचवडला संकुचित राजकारणाचा अभिशाप आहे. ‘रेडझोन मुक्त पिंपरी-चिंचवड’चा लढा २२ वर्षांनंतर सुटण्याची चिन्हे असताना ‘दुधात मिठाचा खडा’ अशी भूमिका योग्य नाही.**




दिघी-भोसरी तसेच देहूरोड-रुपीनगर-तळवडे या दोन्ही रेडझोन चा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावायाचा असेल, तर आधी रेडझोनमधील प्रभावित मिळकती निश्चित करण्याची आवश्यकता आहे. शास्तीकराचा प्रश्न सुटला. त्यावेळी आधी शास्तीकरबाधित मिळकती निश्चित कराव्या लागल्या, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. अनिधकृत बांधकाम, प्राधिकरण परतावा वर्षानुवर्षे जटील प्रश्न सुटले. त्यासाठी प्रभावित मिळकतधारकांची निश्चिती हा प्रमुख मुद्दा होता. अन्यथा न्याय आणि दिलासा द्यायाचा कुणाला? हा प्रश्न आहे.

तत्कालीन आघाडी सरकारच्या काळात २००२ मध्ये रेड झोन घोषीत झाला. २००२ पासून २०१४ पर्यंत राज्यात आणि केंद्रात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीची सत्ता होती. पिंपरी-चिंचवड महापालिकेत २०१७ पर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसची निर्विवाद सत्ता होती. मात्र, अनधिकृत बांधकाम, शास्तीकर, प्राधिकरण परतावा, बफर झोन, आंद्रा-भामा आसखेड पाणी पुरवठा योजना, पवना बंद पाईपलाईन पाणी योजना आणि रेड झोन असे जटील प्रश्न तत्कालीन स्थानिक सत्ताधारी नेत्यांना सोडवता आले नाहीत. पिंपरी-चिंचवडकरांनी २०१४ मध्ये भाजपा-शिवसेना युतीला पसंती दिली. २०१४ पासून २०२४ म्हणजे आतापर्यंत गेल्या १० वर्षांत रेड झोन वगळता प्रमुख प्रश्न सुटले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

२०१४ मध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि तत्कालीन अपक्ष आमदार महेश लांडगे यांनी भाजपाच्या माध्यमातून ‘रेड झोन’ या मुद्याला हात घातला. तात्कालीन संरक्षण मंत्री दिवंगत मनोहर पर्रिकर यांच्या दोन बैठकाही झाल्या. विशेष म्हणजे, साधारणपणे २०१७ मध्ये तळवडे येथे संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये सभाही झाली होती. त्यांनी ‘रेड झोन’ची हद्द कमी करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले. दुर्दैवाने पर्रिकरांच्या मृत्यनंतर हा प्रश्न पुन्हा बाजुला पडला.

पिंपरी-चिंचवडमधील संरक्षण विभागाच्या हद्दीतील रस्ते आणि अन्य प्रकल्पांबाबत महापालिका, जिल्हा प्रशासन, प्राधिकरण अशा विविध अस्थापनांच्या अधिकार क्षेत्रांमुळे एखादा रस्ता करण्यासाठीसुद्धा अनेक जटील प्रक्रियांना सामोरे जावे लागते, याचा अनुभव पिंपरी-चिंचवडकरांना आहे. रक्षक चौक, दिघीतील संरक्षण विभागाचे रस्ते असोत ही बाब प्रकर्षाने लक्षात आली.

### मोजणीला विरोध म्हणजे बांधकाम व्यावसायिकांशी मिलिभगत?

वास्तविक, काही बांधकाम व्यावसायिकांनी प्रशासनाला हातीशी धरून स्वत:च्या मिळकतीवरील ‘रेड झोन’चे शिक्के काढले आहेत. याउलट, अर्धा गुंठा- एक गुंठा जमीन घेतलेल्या आणि भूमिपुत्रांच्या जमिनींवरील रेड झोनचे शिक्के कायम आहेत. असे असतानाही काही बांधकाम व्यावसायिक मोठे गृहप्रकल्प उभारीत आहेत. त्यामधील सदनिकांचे खरेदी-विक्री तेजीत आहे. त्याच बांधकाम व्यावसायिकांचा मोजणीला विरोध आहे. लोकहिताच्या दृष्टीने रेड झोनमधील मिळकती निश्चित केल्या पाहिजेत. त्यासाठी दि. २४ आणि दि. २६ मे रोजी मोजणी होणार आहे. ही मोजणी चार दिवस होणार असून, त्यामुळे रेड झोन प्रभावित मिळकती निश्चित करता येणार आहे. पूर्वी प्रशासनाने सव्हे नंबरनुसार मोघमपणे रेड झोनचे शिक्के दिले आहेत. नकाशा प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक मिळकती रेडझोनच्या क्षेत्रातून मुक्त होतीलच, यासह व्यापक जनहिताच्या दृष्टीने रेड झोनची हद्द कमी करण्यासाठी पाठपुरावा करणे सोईचे होणार आहे. कारण, मोजणीच नसल्यामुळे प्रभावित लोकांची संख्या कशी ठरणार? हा मुद्दा आहे. परिणामी, रेड झोनची मोजणी हा ‘रेड झोन’चा प्रश्न सोडवण्यासाठी दिशादर्शक पाऊल किंवा पाया ठरणार आहे.

### 10 वर्षांमध्ये काय झाले... याकडे दुर्लक्ष का?

संरक्षण विभागाच्या दारुगोळा निर्माणी, खडकी प्रशासनाने रेड झोन सर्वेक्षणाला ‘ग्रीन सिग्नल’ दिला. भारतीय संरक्षण विभागाच्या देहू ॲम्युनेशन डेपो व दिघी मॅगझिन डेपो या भागातील ‘रेडझोन’ चे मार्किंग झालेले नाही. त्यामुळे रेड झोनची मोजणी करुन नकाशा प्रसिद्ध करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली होती. तत्पूर्वी, पर्रिकरांच्या काळात लांडगे या मुद्यावर आग्रही राहिले आहेत. लांडगेंचा पक्ष आणि राजकीय भूमिका हा मुद्दा पिंपरी-चिंचवडकरांच्या हितासमोर गौण आहे. पण, अनधिकृत बांधकाम नियमितीकरणाचा मुद्दा मार्गी लागला. १ हजार चौरस फुटापर्यंतची बांधकामे नियमित झाली आहे. यापेक्षा जास्त क्षेत्रावरील अवैध बांधकामे सर्वसमान्य नागरिकांचे आहेत, असे म्हणणे उचित ठरणार नाही. संपूर्ण शास्तीकर माफीचा ऐतिहासिक निर्णय झाला. नवनगर प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांच्या साडेबारा टक्के परताव्याचाही निर्णय झाला. आंद्रा, भामा आसखेड पाणी प्रकल्प, पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील ‘जैसे थे’ आदेश उठवणे, समाविष्ट गावांच्या विकासाचा अनुशेष भरुन काढणे, बफर झोन कमी करणे, उपयोगकर्ता शुल्काला स्थगिती, वेस्ट टू एनर्जी प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना, संतपीठ महापालिका इमारत, मोशी हॉस्पिटल आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय बैलगाडा शर्यत बंदी उठवण्याचा विषय असे अनेक प्रलंबित प्रश्न गेल्या १० वर्षात मार्गी लागले. याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. आता रेडझोनचा मुद्दा सुटल्यास त्याचा संपूर्ण ‘पॉलिटीकल बेनिफिट’ आमदार महेश लांडगे यांना होवू शकतो. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लांडगे यांना ‘डॅमेज’ करण्यासाठी रेड झोन मोजणीबाबत शंका-कुशंका निर्माण केल्या जात आहेत. प्राधिकरण साडेबारा टक्के परतावा, शास्तीकर माफी आणि उपभोक्ता प्रश्न सुटला. त्यावेळीसुद्धा असाच ‘नॅरेटीव्ह सेट’ करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, हे सर्व निर्णय यशस्वी झाले. त्यामुळे शहरातील कथित पत्रपंडितांचा राजकीय बुरका फाटला होता. वास्तविक, रेडझोनच्या मुद्यावर एकजुटीने प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. पण, पिंपरी-चिंचवडला राजकीय संकुचितपणाचा अभिशाप आहे, हे तुर्तास शक्य नाही. आमदार महेश लांडगे यांना ही लढाई एकाकीपणे लढावी लागणार आहे. पण, रेड झोन बाधित लाखो पिंपरी-चिंचवडकर त्यांच्या लढाईत सोबत राहतील, यात शंका नाही.

### महेश लांडगेंना श्रेय नको; म्हणून ‘नॅरेटीव्ह सेट’ करण्याचा प्रयत्न...

दरम्यान, २०१९ मध्ये राज्यात सत्ता परिवर्तन झाले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात म्हणजे २०२१ मध्ये ‘रेड झोन’ची मोजणी होणार होती. पण, तत्कालीन सत्ताधारी नेत्यांनी ही मोजणी टाळण्याचा प्रयत्न केला. कारण, रेड झोन प्रभावीत क्षेत्रात बांधकाम व्यावसायिकांनी आपले साम्राज्य उभा केले आहे. ते वाचवण्यासाठी राजकीय हस्तक्षेप झाला. जिल्हा प्रशासन, महापालिका स्तरावर दबावाचे सूत्र वापरण्यात आले. महायुतीच्या सत्ताकाळात आमदार महेश लांडगे यांनी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने भोसरीत झालेल्या जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष या मुद्याकडे वेधले. फडणवीसांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे पाठपुरावा करु, असे आश्वासन दिले. योगायोगाने अवघ्या आठ-दहा दिवसांत रेड झोन मोजणीबाबत संरक्षण विभागाकडून ‘एनओसी’ मिळाली. त्यामुळे मोजणीच्या प्रकियेची तयारी झाली. आमदार लांडगे यांना राजकीय श्रेय मिळणार, असे चित्र निर्माण झाल्यामुळे राजकीय कुरघोड्यांचा डाव सुरू झाला. या संकुचित विचारांमुळेच रेड झोन मोजणी कशी सर्वसामान्य नागरिकांच्या मुळावर आहे, असे ‘नॅरेटीव्ह सेट’ करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# होय! मी तुमचाच मुलगा बोलतोय ...!



भूमिका

**लहानपणापासून मनावर एकच बिंबवले आहे . तू ताकदवान आहे. तू सुर्यासमान आहे. तू सर्वशक्तिमान आहे. तू दणकट आहे. तू या घराचा वारीस "कुलदीपक" आहेस. तू खऱ्या अर्थाने मर्द आहेस कारण मर्द को कभी दर्द नहीं होता. कम ऑन मी मुलगाच आहे. मी काही सुपरहिरो नाही याची जाणीव सुद्धा करून द्या. मला हवेत उडता येणार आहे का? किंवा शक्तिमान सारखे एका जागेवरून दुसऱ्या जागी पोहोचता येणार आहे का?**



मग कशाला इतकं सगळं करताय ढेकळाला ढेकुळ राहू द्या उगाच त्याला पर्वत म्हणू नका. होय मी तुमचाच मुलगा बोलतोयइतक्या मोठमोठ्या नावांनी मला नवाजल्या गेले ना की काय सांगू ... राजकुमार ते राजा अशा अनेक सन्मानाने घरी बोलावल्या जातं . आणि ह्या सर्व पदविनुसार पाठीवर जबाबदारीचे ओझे सुद्धा लादले जातात . जसं जसं मोठं होत जातो. तसतसे घरच्यांच्या अपेक्षा आभाळाच्या पल्याड जाऊन टेकलेल्या असतात. अशात सुरवातीपासून बिंबविलेल्या प्रतिमा मला आठवीत राहतात. मुलांनी कुठल्याच कामाला नाही म्हणायचं नाही . त्याने एकदम पेट्रन उठायचं आणि संपूर्ण आभाळ एका झटक्यात काबीज करायचं असतं. आपल्या मनातील भावना ना घरच्यांना, ना बाहेरच्यांना सांगता येत. कारण सुरवातीपासून सांगितलं आहे मागे हटायच नसतं फक्त पुढं पुढं जात राहायचं असतं. कळतं आहे ना मी तुमचाच मुलगा बोलतोय..! घरच्यांना मला डॉक्टर किंवा इंजिनियर बघायचं आहे. नातेवाईकांना मला अजून काही बघायचं आहे. आजी बाबांना मला कलेक्टर बघायचं आहे. आणि मला काय बनायचं हे तर कुणी जाणलंच नाही. मी जाणणार कसा राजकुमार ते राजा यांनीच बनविले तर मी काय बनायचा अधिकार मला कसे देतील . पण मला चेहऱ्यावरील हावभाव यामध्ये बदल न करता यांचं ऐकायचं आहे. माझे ॲक्टर बनण्याचे स्वप्न बाजूला ठेवून मला यांना डॉक्टर किंवा अजून काही बनवायचे आहे. आणि मी ओठांवर संतापरी स्मित ठेवत कुठलेही आढेवेढे न घेता जबाबदारी स्वीकारायची आहे . होय! मी तुमचाच मुलगा बोलतोय..! घराच्यापासून तर समाजापर्यंत प्रत्येकाला माझ्या शिक्षणाचे स्वप्न मला दाखवायचे आहे. मी आत खचलो आहे हे त्यांना कधीच दिसणार नाही कारण मी ही तसे दाखविणार नाही . मला ते झेपवत आहे का? मला ते पटतं आहे का? याची चिंता त्यांना नाही. त्यांना माहिती आहे मी वंशाचा दिवा. मी कुलदीपक आहे. त्यांचे स्वप्न त्यांनी दिलेल्या शपथा त्यांचा मानसन्मान मला मिळवून द्यायचा आहे. समाजात त्यांची मान ताठ राहावी म्हणून सतत त्यांनी लादलेल्या स्वप्नाचा पाठपुरावा करत ते पूर्ण करायचे आहे. कारण तसा घरच्यांनी भावनात्मक कॉंट्रॅक्ट माझ्याशी करवून घेतलेला आहे. होय ! मी तुमचाच मुलगा बोलतोय..! घरच्या अडचणी वाढल्या तर इकडे जॉब करून 9 ते 10 तास ऑफिस चे काम करून मला आता पुढचे शिक्षण करायचे आहे. मिडल क्लास फॅमिली म्हटले तर एवढं तर येणारच ना. कारण माझ्यामागे दोन भावंडे सुद्धा आहे. माझ्यासह त्यांच्या शिक्षणाचा भार थोड्या प्रमाणात का होईना तो मला सांभाळायचा आहे. सुरुवातीला दाखवलेला मला राजकुमार ते राजा हा प्रवास आता मजूर म्हणून सुरू झालेला आहे. उरलेल्या वेळात त्यांनी दिलेले स्वप्न , माझ्या भावंडांचे स्वप्न आणि सर्वांनी माझ्यासाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचे स्वप्न नुसते मला पाहायचे नसून तर ते स्वप्न पूर्ण करायचे आहे. होय ! मी तुमचाच मुलगा बोलतोय. सुरवातीला मेरा राज्या बेटा पासून तर घोड्या तुझं वय किती होत चाललं आहे. याची जाणीव आहे का तुला? बाजूचा मुलगा तुझ्याच वयाचा ना रे, त्याने क्लास टू ची पोस्ट घेतली आहे आणि तू वर्षांवर्षे काय करतोय . काय माहिती ? अमुचे तर नशीबच फुटके असे बोलून घरचे मोकळे होतात आणि उठता-बसता , खाता-पिता एकच त्यांचे गाऱ्हाणे म्हणजे टेपरेकोट त्यांचा सुरू असतो कधीपर्यंत आमच्या जीवावर आयत खाणार . अशा वातावरणात सुद्धा कित्येक मुले हसत-खेळत घराच्या, आजूबाजूच्या गोष्टींना विसरत, ध्येयाकडे वाटचाल करावी लागते. दुःखाला गोंजारत झोपवावे लागते. ऑल इज वेल म्हणत यशोशिखरावर पोहोचे पर्यंत या सर्व कटकटीतून पुढे जावे लागते. सर्व नातेवाईक यांना एकच सांगायचं आहे मी सुद्धा एक आपल्यासारखाच माणूस आहे.

## संपादकीय »

### वैधावैधतेचं वंध्यत्व!

***घाटकोपरची घटना असो की पुण्यातील अपघात, अशा घटनांनंतर सारे शोक वाहण्यात मग्न होतात. काही काळ गेला की प्रकरणावर हळूच पांघरूण घातले जाते.***

कायदेशीर व्यवस्थेत बेकायदा गोष्टींना स्थान नसावे ही आदर्श अपेक्षा झाली. त्याबरहुकूम आपली वाटचाल सुरू आहे का? नसेल तर त्याची कारणे काय? त्यासाठी नेमके कोण जबाबदार? व्यवस्था, समाज की त्यात सामील असलेले समूह व व्यक्ती? असले गंभीर प्रश्न खरेतर पडूच नयेत असाच सध्याचा काळ! या व्यवस्थेत वावरताना काही विपरीत घडले तर हळहळ व दु:ख व्यक्त करावे, चांगले काही निदर्शनास आले तर आनंद मानून घ्यावा. त्यापलीकडे फारसा विचार करायचा नाही. प्रश्न तर पडूच द्यायचे नाहीत. ते पडायला लागले की अकारण मेंदूला झिणझिण्या येतात. अस्वस्थ व्हायला होते. त्यामुळे बहुसंख्य या वाटेने जाण्याचे टाळतात. मात्र काही मोजक्यांची प्रश्नरूपी खोड काही केल्या जात नाही. किमान त्यांच्या तरी मेंदूची दमणूक व्हावी यासाठी काही गोष्टींकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते.

"तू त्यायले समजावून सांग. ते ऐकून नाई राह्यले. 'मले वाटते तसं मी करीन' असं म्हन्तात. एवढं शिकून सवरून काईच फायदा नाई. तुले तरी हे पटून राह्यलं का?" विमलाबाई मोबाईलवर तिच्या मुलाशी, अतुलशी, बोलत होत्या. "बरं झालं मले सांगतलं. नाहीतर इकडे चैन्नईले मले काहीच समजलं नसतं. मी पाहातो बाबाशी बोलून.

# वड्याचं तेल वांग्यावर!

त्यायचा स्वभाव तुले माहीतच हाये. एकदा त्यायच्या मनानं ठरोलं की तसंच करतात ते. नफा तोटा काहीच पाहात नाहीत. ते डोक्शानं कमी अन् मनानं जास्त ईचार करतात.त्यायच्यात अति संवेदनशीलता हाये." तिकडून अतुल बोलला." संवेदनशीलता विचारी असली पाह्यजे, अविचारी नको. त्यायले नौकरी लागली तव्हा सायकलबी नव्हती त्यायच्याजोळ. नौकरीच्या दोन वर्षानं एम एटी घेतली. कित्ती हरीक त्या एमेटीचा! दरोज कपड्यानं स्वच्छ काय करत अन् आठ दिवसांत धुत काय तिले! कित्ती कायजी करत तिची! तव्हा त्वाला जन्मबी नोता झाला. बरं घेतली कोनासाठी? सोतासाठी नाई त त्यायच्या लान भावासाठी, त्वाल्या रमेश काकासाठी. सदाईच त्यायनं सोताचा ईचार केला नाई तर कुटुंबाचाच ईचार केला. सोता सायकलवर हिंडत पन लायन्या भावासाठी फटफटी घेतली. कधीमंधी भावाले काम नसलं तर मंग चालोत ते. एकदा आम्ही दोघं मामाच्या गावाले चाललो होतो तव्हा चालू



गाडीत माला पाय साडीसंग मांगलल्या चाकात फसला. चाक पुरं फिरलं अन् जाम हून गाडी बंद पळ्ळी. माला डावा पाय पुरा पिरगावल्या गेला. गाडी एकदम थांबली. नसती थांबली तर माला पाय तुटून पळ्ळा असता. लोकं धावत आले न त्यायनं मांगललं चाक खोलून माला पाय भाईर काळ्ळा. कपडे कसे पिरगावतो तसा झाला होता तो. लोकायनंच ऑटोरिक्षा थांबोली अन् आम्हांले दवाखान्यात पाठोलं. डाक्टर म्हने की आप्रेशन करून पाय सरका करा लागीन. आप्रेशनची तयारीबी झाली होती पन देवाच्या कृपेने अन् डाक्टरच्या प्रयत्नानं पाय बिना आप्रेशनचा सरका झाला. पन दोन महिने माल्या पायाले प्लॅस्टर होतं.विमलाबाईले भूतकाळातला प्रसंग जसाच्या तसा आठवत होता. लयदा ऐकली हे गोष्ट त्वाल्या तोंडून. मंग बाबाचं त्या गाडीतून मन उतरलं अन् त्यायनं ती गाडी पंधरा दिसातच ईकून टाकली. बाबाचा जीव त्वाल्यात होता. गाळीत नाई." अतुल म्हणाला."त्वाल्या काकाले बंबईले कंपनीत नौकरी लागली. आपुन शहरात नवीन घर बांधलं. मंग म्याच मांगं लागू लागू त्वाल्या जन्माच्या आंधी बजाज कंपनीची बॉक्सर गाडी घ्याले लावली. लय भारी दिसे ती गाडी! त्वाल्या बापाचा लय जीव होता गाडीत. पन दोनच वर्ष झाले अन् दुसरी घटना घळ्ळी.." विमलाबाई परत भूतकाळात गेल्या."हाव. हेबी म्या लयदा ऐकेल हाये. मी दोन वर्षाचा होतो तव्हा कोनी नसताना मी अंगनात उभ्या बॉक्सरवर चढन्याचा प्रयत्न केला अन् ती गाडी माल्या अंगावर पळ्ळी. मी गाडीच्या खाली दबलो. बाबानं बाबा अन् तू लय घाबरले होते. मले ताबडतोब दवाखान्यात नेलं. दवाखान्यात वीस पंचवीस मिनिटानं मी शुद्धीवर आलो तव्हा कुठी बाबाच्या चेहऱ्यावरचं दुख कमी झालं होतं.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिंदे बंगल्यावर बसून पहारा देतायत!

## आता जे मुख्यमंत्री आहेत त्यांना कोणी विचारतं का : राऊत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे सध्या लंडन दौऱ्यावर गेले आहेत. मात्र त्यांच्या या लंडन दौऱ्यावरून विरोधक त्यांच्यावर टीका करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपा नेते आशिष शेलार यांनीदेखील उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. आशिष शेलार म्हणाले, उद्धव ठाकरे लंडनला जाऊन तिथल्या नालेसफाईची आकडेवारी देणार आहेत का? शेलार यांच्या या टीकेला शिवसेनेच्या ठाकरे गटातील आमदार सुनील राऊत यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. राऊत म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात १०० वेळा जगभ्रमंती केली. त्यांनी हे दौरे कशासाठी केले? ते परदेशात काय करायला गेले होते?**



सुनील राऊत म्हणाले, उद्धव ठाकरे परदेश दौऱ्यावर जात असतील तर यांच्या पोटात का दुखतंय? नरेंद्र मोदी दरवर्षी ५० वेळा परदेश दौऱ्यावर जातात. मग तुम्ही त्यांना काय सल्ला देणार आहात? मला असं वाटतं की शेलार आणि एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सल्ला द्यावा की 'हा आपला देश आहे आणि त्यांनी निवडणुकीच्या आधी देशातल्या नागरिकांना जी वचनं दिली होती, आश्वासनं दिली होती, गॅरंटी दिली होती ती पूर्ण करायला हवी. त्यासाठी त्यांनी इथे बसून ते कामं करायला हवीत. उगीच उद्धव ठाकरे यांना प्रश्न विचारायला जाऊ नये.' नरेंद्र मोदी जगभर फिरतात ते तुम्हाला चालतं. आम्ही त्यावर काही आक्षेप घेतो का? परंतु, उद्धव ठाकरे लंडन दौऱ्यावर गेले तर यांच्या पोटात दुखण्याचं कारण काय? त्याऐवजी तुम्ही पंतप्रधानांना जाऊन सल्ले द्या, आम्हाला नको.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्धव ठाकरेंवर टीका करत म्हणाले होते की केवळ वर्षा बंगल्यावर बसून कामं होत नाहीत. मुख्यमंत्र्यांच्या या टीकेला देखील सुनील राऊत यांनी उत्तर दिलं आहे. राऊत म्हणाले, ज्यावेळी उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते तेव्हा देशातल्या सर्वोत्तम पाच मुख्यमंत्र्यांच्या यादीत उद्धव ठाकरेंचं नाव घेतलं जात होतं. आता जे मुख्यमंत्री आहेत त्यांना कोणी विचारतं का? तेच आज कामांबद्दल बोलतायत. मुळात कामं करायला डोक्याची गरज असते. नुसती घरात बसून कामं होत नाहीत एकनाथ शिंदे केवळ वर्षा बंगल्यावर बसून असतात, कारण ते महाराष्ट्रात आणि देशात फिरू शकत नाहीत. त्यांना माहिती आहे ते वर्षा बंगला सोडून दुसरीकडे गेले तर त्यांनी आमचे जे आमदार चोरून नेले आहेत ते आमदार त्यांच्याजवळ राहणार नाहीत. हे लोक त्यांच्याबरोबर किती दिवस टिकून राहतील याबाबत शंका आहे म्हणून ते वर्षा बंगल्यावर बसून पहारा देतात, आमदारांवर लक्ष ठेवतात.शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे सध्या लंडन दौऱ्यावर गेले आहेत. मात्र त्यांच्या या लंडन दौऱ्यावरून विरोधक त्यांच्यावर टीका करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपा नेते आशिष शेलार यांनीदेखील उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. आशिष शेलार म्हणाले, उद्धव ठाकरे लंडनला जाऊन तिथल्या नालेसफाईची आकडेवारी देणार आहेत का? शेलार यांच्या या टीकेला शिवसेनेच्या ठाकरे गटातील आमदार सुनील राऊत यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. राऊत म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात १०० वेळा जगभ्रमंती केली. त्यांनी हे दौरे कशासाठी केले? ते परदेशात काय करायला गेले होते? सुनील राऊत म्हणाले, उद्धव ठाकरे परदेश दौऱ्यावर जात असतील तर यांच्या पोटात का दुखतंय? नरेंद्र मोदी दरवर्षी ५० वेळा परदेश दौऱ्यावर जातात. मग तुम्ही त्यांना काय सल्ला देणार आहात? मला असं वाटतं की शेलार आणि एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सल्ला द्यावा की 'हा आपला देश आहे आणि त्यांनी निवडणुकीच्या आधी देशातल्या नागरिकांना जी वचनं दिली होती, आश्वासनं दिली होती, गॅरंटी दिली होती ती पूर्ण करायला हवी. त्यासाठी त्यांनी इथे बसून ते कामं करायला हवीत. उगीच उद्धव ठाकरे यांना प्रश्न विचारायला जाऊ नये.' नरेंद्र मोदी जगभर फिरतात ते तुम्हाला चालतं. आम्ही त्यावर काही आक्षेप घेतो का? परंतु, उद्धव ठाकरे लंडन दौऱ्यावर गेले तर यांच्या पोटात दुखण्याचं कारण काय?

### तर यांच्या पोटात का दुखतंय?

सुनील राऊत म्हणाले, उद्धव ठाकरे परदेश दौऱ्यावर जात असतील तर यांच्या पोटात का दुखतंय? नरेंद्र मोदी दरवर्षी ५० वेळा परदेश दौऱ्यावर जातात. मग तुम्ही त्यांना काय सल्ला देणार आहात? मला असं वाटतं की शेलार आणि एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सल्ला द्यावा की 'हा आपला देश आहे आणि त्यांनी निवडणुकीच्या आधी देशातल्या नागरिकांना जी वचनं दिली होती, आश्वासनं दिली होती, गॅरंटी दिली होती ती पूर्ण करायला हवी.त्याऐवजी तुम्ही पंतप्रधानांना जाऊन सल्ले द्या, आम्हाला नको.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्धव ठाकरेंवर टीका करत म्हणाले होते की केवळ वर्षा बंगल्यावर बसून कामं होत नाहीत. मुख्यमंत्र्यांच्या या टीकेला देखील सुनील राऊत यांनी उत्तर दिलं आहे.

# अजित पवार गटात लवकरच मोठं इनकमिंग

## अजित पवार गटाची 27 मे रोजी महत्वाची बैठक : सुनील तटकरे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील मतदान आज पार पडले. सातव्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. महाराष्ट्रातील पाचही टप्प्यातील मतदान झालेलं आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. मात्र, लोकसभा निवडणूक संपत नाही तोच राजकीय पक्ष महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत.**

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची २७ मे रोजी मुंबईत महत्वाची बैठक बोलावण्यात आली असल्याची माहिती खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात लवकरच मोठं इनकमिंग होणार असल्याचं सूचक विधानंही त्यांनी केलं."राज्यभरात लोकसभेचं मतदान झालं. लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रीय प्रश्न आणि राष्ट्रीय भूमिका मांडण्याचा प्रयत्न आम्ही केला. देशाचं भवितव्य ठरवणारी निवडणूक होती, अशा प्रकारे आम्ही या निवडणुकीला सामोरे गेलो. विरोधकांनी अगदी गल्लीबोळातील प्रश्नांवर भर दिला. निवडणुकीच्या प्रचारात



विरोधकांकडून ज्या प्रकारे भाषा वापरण्यात आली ही भाषा महाराष्ट्राच्या संस्कृतीला छेद देणारी होती. असं असलं तरी महायुतीला राज्यात निश्चितच चांगलं यश मिळेल. लढती चुरशीच्या होतील पण अंतिम विजय महायुतीचा होईल", असं मत सुनील तटकरे यांनी व्यक्त केलं.राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची परवा महत्वाची बैठक मुंबईत बोलावली आहे. या बैठकीला पक्षाचे सर्व प्रमुख नेते उपस्थित असणार आहेत. आमची आढावा बैठक जरी असली तरी आम्ही स्पष्टपणे धोरण ठरवलेलं आहे. आता एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र, हे सूत्र आम्ही राबवणार आहोत. या माध्यमातून पुन्हा एकदा संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने पावलं उचलण्यात येतील. १० तारखेला वर्धापन दिन आहे. हा वर्धापन दिन मुंबई आणि दिल्लीत साजरा करण्याचं नियोजन आहे. त्या बैठकीला सर्व नेते उपस्थित राहतील. तसेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरच्या अनेक सहकार्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश होईल. हा पक्षप्रवेश राज्याच्या, देशाच्या आणि पक्षाच्या राजकारणाला कलाटणी देणारा असेल"

### काहीजण पटेल यांच्याही संपर्कात

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात होणाऱ्या पक्ष प्रवेशाबाबत बोलताना सुनील तटकरे म्हणाले, "अनेकांचा संपर्क वेगवेगळ्या स्थरावर आहे. संघटनात्मक स्थरावरही संपर्क आहे. काहींशी माझा संपर्क तर काही अजित पवार यांच्या संपर्कात आहेत. काहीजण प्रफुल्ल पटेल यांच्याही संपर्कात असू शकतात. त्यामुळे सर्वकाही चित्र २७ तारखेला स्पष्ट होईल", असं मोठं विधान सुनील तटकरे यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केलं.लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील मतदान आज पार पडले. सातव्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे.

# चांगलं काम केलं की चांगला निकाल लागतो!

## मल्लिकार्जुन खरगेंची मोदींवर शेलक्या शब्दांत टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यासाठी प्रचार करत आहेत. तसंच लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. अशात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरु आहेत. मल्लिकार्जुन खरगेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर शेलक्या शब्दांत टीका केली आहे. आज संध्याकाळी ६ वाजता सहाव्या टप्प्यातलं मतदान संपलं आहे. तर १ जूनच्या दिवशी लोकसभा निवडणुकीचा सातवा टप्पा पार पडणार आहे. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीचे पाच टप्पे पार पडले. या सगळ्या दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महाराष्ट्रात रेकॉर्डब्रेक सभा घेतल्या. देवेंद्र फडणवीस यांनी तर १०० हून अधिक सभा घेतल्या. आता १ जूनचा एक टप्पा राहिला आहे. ज्यानंतर ४ जूनला लोकसभेचा निकाल लागणार आहे. त्याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. अशात मल्लिकार्जुन खरगेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी विषासारखे आहेत असं म्हणत त्यांच्यावर टीका केली आहे.**

"पंतप्रधान नरेंद्र मोदी गंगेने बोलवून घेतलं आहे. २०४७ पर्यंत ते शासन करणार आहेत असंही त्यांचं म्हणणं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी गंगेत डुबकी मारतात, गुहेत जाऊन बसतात, ध्यानधारणा करतात, तपश्चर्या करतात. या सगळ्याचं फळ त्यांना मिळणार असेल तर माहीत नाही. मला वाटतं की काम केलं की तुम्हाला दोनवेळची भाकरी मिळते." असं वक्तव्य खरगेंनी केलं आहे.मल्लिकार्जुन खरगे पुढे म्हणाले, "चांगलं काम केलं की चांगला निकाल लागतो, वाईट काम केलं की वाईट निकाल लागतो. जर वाईट करुन चांगला निकाल लागतो असं असेल तर काय बोलणार? आम्ही जर म्हटलं हे विष आहे त्याला हात लावू नकोस. तरीही एखादा माणूस म्हणाला मी विष चाटून पाहतो काय होईल? मोदींचं तसंच आहे." असा टोला मल्लिकार्जुन खरगेंनी लगावला आहे.लोकसभेची रणधुमाळी अखेरच्या टप्प्यात आहे. भाजपाने एनडीएसह ४०० पारचा नारा दिला आहे. तर दुसरीकडे इंडिया आघाडीनेही आम्ही सत्तेवर येऊ असा दावा वारंवार केला आहे. यावेळी मोदींना जनता नाकारणार आहे असंही इंडिया आघाडीच्या नेत्यांनी म्हटलं आहे. तसंच राहुल गांधींनीही पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. मात्र नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. अशात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विषासारखे आहेत अशी शेलकी टीका मल्लिकार्जुन खरगेंनी केली आहे.देशात आज लोकसभेच्या सहाव्या टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडत आहे. आता १ जून रोजी शेवटचा टप्पा संपन्न होईल. त्यामुळे निवडणुकीचा प्रचारही शेवटचे काही दिवस उरला आहे. बिहारच्या पाटणा येथे एका जाहीर सभेला संबोधित करत असताना मोदींनी इंडिया आघाडीला इंडी आघाडी असे म्हणत टीका केली.



### रणधुमाळी अखेरच्या टप्प्यात

लोकसभेची रणधुमाळी अखेरच्या टप्प्यात आहे. भाजपाने एनडीएसह ४०० पारचा नारा दिला आहे. तर दुसरीकडे इंडिया आघाडीनेही आम्ही सत्तेवर येऊ असा दावा वारंवार केला आहे. यावेळी मोदींना जनता नाकारणार आहे असंही इंडिया आघाडीच्या नेत्यांनी म्हटलं आहे. तसंच राहुल गांधींनीही पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. मात्र नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. अशात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विषासारखे आहेत अशी शेलकी टीका मल्लिकार्जुन खरगेंनी केली आहे.

विरोधकांकडून सातत्याने आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. यावर उत्तर देताना मोदी म्हणाले की, मतपेटीचे राजकारण करत असताना इंडी आघाडी 'त्यांच्यासमोर' मुजरा करत आहे. पंतप्रधान मोदींच्या या नव्या विधानामुळे आता वाद निर्माण झाला असून काँग्रेस नेत्यांनीही या विधानावर पलटवार केला आहे.पाटणा येथील जाहीर सभेत बोलताना त म्हणाले, इंडिया आघाडीला मतपेटीची गुलामी करायची असेल त्यांच्यासमोर जाऊन मुजरा करायचा असेल तर करावा. मी मात्र एससी, एसटी आणि ओबीसींच्या आरक्षणासाठी खंबीरपणे उभा आहे.

राष्ट्रीय जनता दल (RJD) आणि काँग्रेसने एकत्र येऊन यादव, कुर्मी, कुशवाहा, तेली, कान्हू, निषाद आणि पासवान या समाजाच्या आरक्षणावर दरोडा घातला. संविधानानुसार धर्माच्या आधारावर कुणालाही आरक्षण देता येत नाही. पण काँग्रेसने मतपेटीच्या राजकारणासाठी कायद्यात बदल केला.पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, "आरजेडी, काँग्रेस आणि इंडिया आघाडीला संविधान बदलून संपूर्ण देशात धर्माच्या आधारावर आरक्षण द्यायचे आहे, या सत्यापासून ते तोंड लपवू शकत नाहीत. मी आज बिहारच्या या सामाजिक न्यायाच्या पूण्य भूमीतून संपूर्ण देश आणि बिहारला एक गॅरंटी देऊ इच्छितो. मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत एससी, एसटी, ओबीसी आणि अतिमागास वर्गाच्या अधिकारांना कुणालाही हिसकावू देणार नाही.

ही मोदी गॅरंटी आहे." "माझ्यासाठी संविधान सर्वप्रथम आहे. माझ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे आहेत. इंडिया आघाडीला मतपेटीची गुलामी करायची असेल तर त्यांनी करावी, त्यांच्यासमोर जाऊन मुजरा करावा. मी मात्र वंचितांच्या बाजूने खंबीरपणे उभा राहिल", अशा शब्दात मोदींनी इंडिया आघाडीवर टीका केली.पंतप्रधान मोदींच्या टीकेचा समाचार काँग्रेसकडून घेण्यात आला आहे. काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा म्हणाले की, आज पंतप्रधानांच्या तोंडून मुजरा शब्द ऐकला. मोदीजी तुम्ही स्वतःची काय अवस्था करून घेतली आहे? काही घेत का नाहीत? अमित शाह आणि जेपी नड्डा यांनी त्यांना तात्काळ उपचार मिळवून द्यावेत.

कदाचित उन्हात सतत प्रचार केल्यामुळे त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. त्यांना उन्हात प्रचार करायची सवय नसेल.पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यासाठी प्रचार करत आहेत. तसंच लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. अशात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरु आहेत.

---

# पाकिस्तानी नेत्याला केजरीवालांनी सुनावले

## इस वक़्त पाकिस्तान के हालात बहुत ख़राब हैं : केजरीवाल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्याचे मतदान होत आहे. दिल्लीतील सातही जागांवर आज मतदान होत असून आम आदमी पक्षाचे संयोजक आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी कुटुंबासह मतदान केले. यानंतर पाकिस्तानमधील एका नेत्याने त्यांचा फोटो शेअर करत भारतातील निवडणुकांवर भाष्य केले होते.**

मात्र अरविंद केजरीवाल यांनी या पोस्टवर संताप व्यक्त करत पाकिस्तानी नेत्यालाच खडे बोल सुनावले.अरविंद केजरीवाल यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर कुटुंबासह मतदान केल्याचा फोटो शेअर केला. कॅप्शनमध्ये लिहिले, "मी आज वडील, पत्नी आणि मुलांसह मतदान केले. माझी आई आजारी असल्यामुळे ती मतदानासाठी येऊ शकली नाही. मी हुकूमशाही, बेरोजगारी आणि महागाईविरोधात मतदान केले. प्रत्येकाने मतदान केले पाहीजे."अरविंद केजरीवाल यांचा पोस्टला रिपोस्ट करत पाकिस्तानी नेते आणि माजी मंत्री फवाद हुसैन चौधरी यांनी लिहिले, "शांतता आणि सौहार्द हाच द्वेष आणि कट्टरतावादाचा पराभव करू शकेल. तुम्हाला आणखी शक्ती लाभो." या मजकुरात पुढे INDIAELECTION2024 असा हॅशटॅग देण्यात आला आहे. पाकिस्तानी नेत्याचे कौतुक केजरीवाल यांना फारशे रुचले नाही. पाकिस्तानच्या तेहरीक-ए-इन्साफच्या फवाद हुसैन चौधरी यांच्यावर टीका केली . अरविंद केजरीवाल म्हणाले, "चौधरी साहेब,



मी आणि माझ्य देशातील जनता आमच्या समस्या सोडविण्यासाठी सक्षम आहोत. आम्हाला तुमच्या पोस्टची गरज नाही. सध्या पाकिस्तानची अवस्था अतिशय गंभीर आहे. तुम्ही आधी तुमचा देश सांभाळा. भारतातील निवडणुका हा आमचा अंतर्गत विषय आहे. दहशतवादाला सर्वाधिक प्रोत्साहन देणाऱ्यांकडून आम्हाला या विषयात ढवळाढवळ नको आहे."फवाद हुसैन चौधरी यांनी याआधीही भारतीय निवडणुकीवर भाष्य केलेले आहे. गुरुवारी त्यांनी राहुल गांधी यांचा एक व्हिडीओ शेअर केला होता. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, पाकिस्तानचे माजी मंत्री फवाद हुसैन चौधरी यांनी पुलवामा आणि उरी हल्ल्यामागे पाकिस्तानी दहशतवादी असल्याचा दावा केला होता.

### सरकार बनवण्याची परवानगी द्यावी?

गांधींचे मात्र कौतुक करत आहेत. राजनाथ सिंह यांनी एका जाहीर सभेत या विषयाचा उल्लेख केला होता. ते पुढे म्हणाले, "मला तुम्हाला (लोकांना) विचारायचे आहे की, शत्रूने कौतुक केलेल्या अशा नेत्याचा आदर करावा की, त्यांना सरकार बनवण्याची परवानगी द्यावी? यांना देशाला कोणत्या दिशेने न्यायचे आहे? यासाठी मी सर्वांना देश वाचविण्याचे आवाहन करतो.लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्याचे मतदान होत आहे. दिल्लीतील सातही जागांवर आज मतदान होत असून आम आदमी पक्षाचे संयोजक आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी कुटुंबासह मतदान केले.

# पती डॉक्टर, तर माधुरी दीक्षितच्या सासऱ्यांचं शिक्षण किती?

बॉलीवूडची धकधक गर्ल माधुरी दीक्षितने १७ ऑक्टोबर १९९९ मध्ये डॉ. श्रीराम नेने यांच्याशी लग्न केलं. लग्नानंतर काही काळ माधुरीने इंडस्ट्रीमधून ब्रेक घेतला होता. पुढे, काही वर्षांत नेने कुटुंबीय अमेरिकेहून भारतात परतलं आणि माधुरीने बॉलीवूडमध्ये पुनरागमन केलं. डॉ. नेने यांचे आई-वडील याआधी फारसे कॅमेऱ्यासमोर आले नव्हते. 'पंचक' चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेत्रीच्या सासू-सासऱ्यांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. याशिवाय डॉ. नेने सोशल मीडियावर त्यांचे अनेक कौटुंबिक फोटो शेअर करत असतात. नुकतीच त्यांनी आपल्या युट्यूब चॅनेलला आई-बाबांची मुलाखत घेतली. यावेळी त्यांचे वडील माधव नेने यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाबद्दल सांगितलं.माधुरी दीक्षितचे सासरे म्हणाले, "मी १९६३ ला इंग्लंडला गेलो त्याआधी आम्ही दादरला शिवाजी पार्क परिसरात राहायचो. मला तीन भाऊ आणि एक बहीण... अशी आम्ही पाच भावंडं एकत्र वाढलो. माझं मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण दादरच्या छबीलदास शाळेत पूर्ण झालं. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी मी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यावेळी मी लोकल ट्रेनने प्रवास करायचो. अर्थात महाविद्यालयात मी असताना प्रचंड



अभ्यास केला. माझे दोन्ही काका त्याकाळी उच्चशिक्षित असल्याने त्यांच्याकडे बघून मी माझा शैक्षणिक प्रवास पूर्ण केला."माधव नेने पुढे म्हणाले, "कालांतराने मी पुणे इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सगळ्या विषयात चांगले गुण असल्याने मला कोणत्याही महाविद्यालयात अगदी सहज प्रवेश मिळाला असता. १९६० मध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याच्या पुढचं एक वर्ष मी टाऊन प्लॅनिंग विभागात नोकरी केली. त्यानंतर मी 'जे.सी.गॅमन कंपनी'मध्ये रुजू झालो कारण, माझं पदवीपर्यंतचं शिक्षण स्थापत्य अभियांत्रिकी विभागात (CIVIL ENGINEERING) पूर्ण झालं होतं. हळुहळू मला परदेशातील शिक्षणाचं महत्त्व समजलं. पुढे तीन वर्षे नोकरी करून मी पैसे जमावले आणि इंग्लंड येथील इम्पेरियल महाविद्यालयात शैक्षणिक प्रवेशासाठी अर्ज केला. मोडक म्हणून प्रसिद्ध इंजिनिअर होते त्यांनी मला या संपूर्ण प्रवासात खूप मदत केली."

## मीसुद्धा सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो

चार वर्ष उलटून गेली तरी अजूनही सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूबद्दल चर्चा होताना दिसत आहे. त्याचे चाहते अजूनही या धक्क्यातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. सुशांतच्या मृत्यूमागचं गूढ हे अजूनही कायम आहे. पोलिसांनी जरी त्याची केस बंद केली असली तरी याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होताना आपल्याला पाहायला मिळते. कोणत्याही गॉडफादरशिवाय केवळ स्वतःच्या मेहनतीवर सुशांतने चित्रपटसृष्टीत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.सुशांतच्या याच स्ट्रगलबद्दल नुकतंच अभिनेता विवेक ओबेरॉयने भाष्य केलं आहे. इतकंच नव्हे तर सुशांतच्या अंत्यसंस्कारावेळी विवेक स्वतः तिथे उपस्थित होता. त्यावेळी सुशांतच्या वडिलांना पाहून त्याला काय भावना मनात दाटल्या याबद्दल विवेकने खुलासा केला आहे. इतकंच नव्हे तर आपल्या अडचणीच्या काळात आपणही सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो हेदेखील विवेकने स्पष्ट केलं.

## मेधाने सांगितला प्रवास



विक्रांत मेसी आणि मेधा शंकर अभिनीत '12TH फेल' २०२३ चा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला. फक्त २० कोटी बजेट असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ६६.५८ कोटींची कमाई केली. ६९ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात '12TH फेल' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. हा चित्रपट प्रेक्षकांसह अनेक कलाकारांच्या पसंतीस उतरला आणि त्यांनी भरभरून या चित्रपटाचं कौतुक केलं. या चित्रपटात विक्रांत मेसी याने मनोज शर्मा, तर मेधा शंकरने श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारली होती.'12TH फेल' चित्रपट २५० भारतीय चित्रपटांच्या यादीत सामील झाला आहे. अशातच चित्रपटात श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारणाऱ्या मेधा शंकरला आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण आली. तिने सांगितले की एक काळ असा होता जेव्हा तिच्या बँकेच्या खात्यात फक्त २५७ रुपये शिल्लक होते.अलीकडेच आयएमडीबीला (IMDB) दिलेल्या मुलाखतीत मेधा शंकरने तिच्या संघर्षातील दिवसांची आठवण सांगितली. ती म्हणाली, '12TH फेल' चित्रपटाचा भाग होण्यासाठी तिला खूप वेळ लागला. मेधाने २०१८ मध्ये मुंबईत अभिनेत्री म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. २०२२ मध्ये तिने या चित्रपटासाठी कास्टिंग एजन्सीकडे पहिल्यांदा ऑडिशन दिले. नंतर ती दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा आणि त्यांच्या टीमबरोबर स्क्रीन टेस्टसाठी गेली.ऑडिशनदरम्यान मेधाला हा रोल तिच्यासाठीच आहे अस वाटलं होतं.

## हुड्डाने केले स्वत:ला कैद

भूमिका कोणतीही असो, त्या भूमिकेशी अगदी समरस होऊन काम करणाऱ्या काही मोजक्या मेहनती अभिनेत्यांच्या यादीत रणदीप हुड्डा हे नाव हमखास येतंच. आजवर रणदीपने विविध भूमिका साकारल्या आहेत. पण सध्या मात्र तो त्याच्या आगामी 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या घोषणेपासूनच सर्वांचं लक्ष या चित्रपटाकडे लागलं आहे. सर्वप्रथम हा चित्रपट महेश मांजरेकर दिग्दर्शित करणार होते. काही कारणास्तव महेश मांजरेकर यांनी यातून काढता पाय घेतला अन् दिग्दर्शनाची धुरा रणदीपने स्वतःच्या खांद्यावर पेलली.या चित्रपटात रणदीप हा स्वातंत्र्यवीर सावरकरांची भूमिका साकारणार असून याचं दिग्दर्शनही त्यानेच केलं आहे. गेल्यावर्षी या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता ज्याला उदंड प्रतिसाद मिळाला होता. अखेर यावर्षी मार्च महिन्यात हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रणदीपने एक खास पोस्ट शेअर करत सावरकरांना मानवंदना दिली आहे.चित्रपटाच्या रेकीदरम्यान रणदीपने अंदमानच्या सेल्युलर जेलला भेट दिली होती. तेव्हाचे फोटोज रणदीपने शेअर केले आहेत. सावरकर यांना ज्या कोठडीत ठेवलं होतं त्या सेलमध्ये जाऊन रणदीप सावरकरांच्या प्रतिमेपुढे नतमस्तक झालेला आपल्याला पाहायला मिळत आहे. हे फोटोज रणदीपने त्याच्या सोशल महान पुत्र, नेता, स्वातंत्र्यसैनिक, लेखक, कवि, तत्वज्ञ अशा स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी. त्यांच्या बुद्धीचं प्रखर तेज व साहसाला घाबरून ब्रिटिशांनी त्यांना ७ बाय ११ च्या छोट्याश्या जेलमध्ये दोन काळ्यापाण्याच्या शिक्षेसाठी डांबलं.

## माधुरीचा 'हम आपके है कौन'चा खास लूक



बॉलीवूडमधील धक धक गर्ल माधुरी दीक्षित आजही तिच्या अभिनयासह नृत्य कौशल्यामुळे चर्चेत आहे. १९९४ रोजी प्रदर्शित झालेला 'हम आपके है कौन' या चित्रपटातील माधुरी दीक्षित आणि सलमान खानची जोडी लोकप्रिय ठरली होती. यात अभिनेत्री विविध प्रकारच्या मॉडर्न आणि एथिनिक लूकमध्ये दिसली होती. या चित्रपटातील गाणी आणि कथानकामुळे चित्रपट हिट झाला होता.मोठ्या कुटुंबासह मित्रपरिवारासमवेत होणाऱ्या भव्य लग्नसोहळ्याचा ट्रेंड त्याकाळी चित्रपटामुळे घराघरांत पोहोचला. चित्रपटात हिंदी सिनेसृष्टीतल्या दिग्गज कलाकारांसह मराठमोळे कलाकारही होते. रेणुका शहाणे, अनुपम खेर, रिमा लागू, अलोक नाथ, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया बेर्डे अशी स्टारकास्ट या चित्रपटाला लाभली होती.'हम आपके है कौन' चित्रपटातील 'दीदी तेरा देवर दीवाना' हे गाणं तेव्हा खूप प्रसिद्ध झालं होतं. या गाण्यामधील माधुरी दीक्षितच्या जांभळ्या रंगाच्या साडीने आणि बॅकलेस ब्लाऊजने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं. प्रसिद्ध डिझायनर अण्णा सिंग यांनी त्यावेळी ही साडी डिझाइन केली होती. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी तब्बल ₹१.५ दशलक्ष किंमतीची ही साडी केवळ फॅशन स्टेटमेंटच नव्हती, तर तिच्या अनोख्या बॅकलेस ब्लाउज आणि फूल स्लीव्हजसह त्याकाळी चर्चेचा विषय ठरली.तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा माधुरीने 'दीदी तेरा देवर दीवाना' या गाण्यातील जांभळ्या साडीमधला लूक रिक्रिएट केला आहे. या लूकचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. 'डान्स दिवाने'च्या रिॲलिटी शोसाठी माधुरीने या आउटफिटची निवड केली आहे.

# हार्दिक पंड्याच्या घटस्फोटाच्या चर्चा!

## हार्दिकच्या संपत्तीतील इतका मोठा हिस्सा होणार नताशाच्या नावे?

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पंड्या आणि नताशा स्टॅनकोविक यांच्या घटस्फोटाबाबत अनेक चर्चा सुरू आहेत. मात्र, याला कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. सोशल मीडियावर घटस्फोटाची चर्चा आहे. दरम्यान, आता नताशाने तिच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अशी तरी पोस्ट केलीय ज्यामुळे खळबळ उडाली आहे. वास्तविक, नताशाने तिच्या इन्स्टाग्रामवर अनेक स्टोरी पोस्ट केल्या आहेत, ज्यापैकी एक सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली आहे.**



नताशाने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे, ज्यामध्ये ती तिचा मुलगा अगस्त्यासोबत दिसत आहे. यासोबतच तिने पाठीमागे एक इंग्रजी गाणेही जोडले आहे. त्याच वेळी, तिच्या पुढील दोन स्टोरींमध्ये ती वर्कआउट करताना दिसत आहे. काही तासांपूर्वी तिने इन्स्टाग्रामवर आणखी एक स्टोरी पोस्ट केली होती, ज्यामध्ये नताशाने लिहिले होते, 'कोणीतरी रस्त्यावर येणार आहे.' या पोस्टच्या पार्श्वभूमीत ड्रायव्हिंग स्कूल मॅन्युअलचा एक साइनबोर्ड दिसत आहे. सोशल मीडियावर चाहत्यांकडूनही याविषयी प्रतिक्रिया येत आहेत. वास्तविक, सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल झाली होती ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की नताशाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून तिचे आडनाव हटवले आहे. असे म्हटले जात होते की, नताशा आधी तिचे नाव इन्स्टाग्रामवर 'नताशा स्टॅनकोविक पंड्या' असे लिहायची, पण आता तिने पंड्या आडनाव काढून हटवले आहे. यानंतर दोघांमध्ये सर्व काही ठीक नसल्याच्या बातम्या येऊ लागल्या. विशेष म्हणजे ४ मार्चला नताशाचा वाढदिवस होता. पण हार्दिक पंड्याने तिच्या शेवटच्या वाढदिवसाला एकही सोशल मीडिया पोस्ट शेअर केली नव्हती. नताशा आणि हार्दिक दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. पण पंड्याच्या टाइमलाइनवर वाढदिवसासंदर्भात एकही पोस्ट दिसली नाही.मुंबई इंडियन्सने हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली आयपीएल २०२४ चा हंगाम खेळला, ज्यामध्ये संघाची कामगिरी खूपच खराब होती आणि ते प्लेऑफ्ससाठी देखील पात्र ठरू शकले नाहीत. या संपूर्ण स्पर्धेतही नताशा मुंबई इंडियन्स आणि हार्दिक पंड्याला पाठिंबा देण्यासाठी स्टेडियममध्ये दिसली नाही. असा दावाही केला जात आहे की नताशाने हार्दिक पंड्यासोबतच्या नुकत्याच केलेल्या सर्व पोस्ट सोशल मीडियावरून हटवल्या आहेत. हार्दिक आणि नताशा बऱ्याच दिवसांपासून सोशल मीडियावर एकत्र दिसत नाहीत. नताशा आणि हार्दिक यांचे २०२० मध्ये लग्न झाले असून दोघांनाही एक मुलगा आहे.मीडिया रिपोर्टनुसार, हार्दिक पंड्या आणि नताशा स्टॅनकोविक घटस्फोट घेणार असल्याची चर्चा सुरू आहे. याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, रिपोर्टनुसार घटस्फोटानंतर हार्दिक पंड्याच्या संपत्तीतील ७० टक्के संपत्ती ही नताशाच्या नावे होणार आहे, यामुळे हार्दिक पंड्याची आर्थिक स्थिती खराब होण्याची शक्यता आहे. सोशल मीडियावर या संबंधित अनेक पोस्टदेखील व्हायरल होत आहेत. हार्दिक पांड्याने मुंबईत एक अपार्टमेंट घेतली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, त्याने यासाठी ३० कोटी रुपये मोजले आहेत. याशिवाय त्याचे वडोदरा येथे एक पेंटहाऊस आहे, त्याची किंमतही करोडोंमध्ये आहे. मात्र, घटस्फोटानंतर पंड्याची आर्थिक स्थिती बिघडू शकते. नताशाने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे, ज्यामध्ये ती तिचा मुलगा अगस्त्यासोबत दिसत आहे. यासोबतच तिने पाठीमागे एक इंग्रजी गाणेही जोडले आहे. त्याच वेळी, तिच्या पुढील दोन स्टोरींमध्ये ती वर्कआउट करताना दिसत आहे. काही तासांपूर्वी तिने इन्स्टाग्रामवर आणखी एक स्टोरी पोस्ट केली होती, ज्यामध्ये नताशाने लिहिले होते, 'कोणीतरी रस्त्यावर येणार आहे.

### कोलकाता संघ पहिल्या स्थानावर

सोशल मीडियावर चाहत्यांकडूनही याविषयी प्रतिक्रिया येत आहेत. वास्तविक, सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल झाली होती ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की नताशाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून तिचे आडनाव हटवले आहे. असे म्हटले जात होते की, नताशा आधी तिचे नाव इन्स्टाग्रामवर 'नताशा स्टॅनकोविक पंड्या' असे लिहायची, पण आता तिने पंड्या आडनाव काढून हटवले आहे. यानंतर दोघांमध्ये सर्व काही ठीक नसल्याच्या बातम्या येऊ लागल्या. विशेष म्हणजे ४ मार्चला नताशाचा वाढदिवस होता. पण हार्दिक पंड्याने तिच्या शेवटच्या वाढदिवसाला एकही सोशल मीडिया पोस्ट शेअर केली नव्हती. नताशा आणि हार्दिक दोघेही सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत.

# मी मिताली राजशी लग्न करत आहे!

## शिखरने 'धवन करेंगे' शोमध्ये लग्नाबद्दल केला खुलासा

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाबाहेर असलेला सलामीवीर शिखर धवन सध्या जिओ सिनेमावर सुरू असलेल्या 'धवन करेंगे' शोमुळे चर्चेत आहे. शिखर धवन आयपीएल २०२४ च्या पहिल्या काही सामन्यांमध्ये पंजाब किंग्जचे नेतृत्व करताना दिसला होता, परंतु दुखापतीमुळे त्याला हंगामाच्या मध्यभागी पायउतार व्हावे लागले. यानंतर सॅम करनने पंजाब किंग्जची कमान हाती घेतली. आयपीएल २०२४ मध्ये, पंजाब किंग्स लीग टप्प्यातील १४ पैकी केवळ ५ सामने जिंकू शकले आणि गुणतालिकेत नवव्या स्थानावर राहिले.**



अशात शिखर धवनने भारतीय महिला संघाची माजी कर्णधार मिताली राजबरोबरच्या त्याच्या लग्नाबाबत एक मोठा खुलासा केला आहे.धवन अजून काही आयपीएल सीझन खेळू शकतो, पण टीम इंडियात त्याचे पुनरागमन आता अशक्य दिसत आहे. तसेच भारतीय संघाची माजी कर्णधार मिताली राज सध्या डब्ल्यूपीएलमध्ये गुजरात जायंट्स संघात मार्गदर्शकाची भूमिका निभावत आहे. अलीकडेच ती शिखर धवनसोबत जिओ सिनेमाच्या 'धवन करेंगे' या शोमध्ये दिसली होती. या शोमध्ये धवनने मितालीबरोबरच्या लग्नाच्या अफवांवर खुलेपणाने प्रतिक्रिया दिया. शिखर धवन म्हणाला, मी ऐकले माझे मिताली राजशी लग्न होणार आहे, असे म्हणताच मिताली आणि धवन जोरजोरात हसू लागले.

भारताचा अनुभवी फलंदाज शिखर धवनने स्वत:बद्दल एक रोचक खुलासा केला आहे. शिखर धवनने 'धवन करेंगे' शोमध्ये माजी महिला क्रिकेटपटू मिताली राजसोबतच्या लग्नाच्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली. याशिवाय धवनने कार अपघातानंतर क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या ऋषभ पंतबद्दलही आपले मते मांडले.मिताली राज धवनच्या शोमध्ये पाहुणी म्हणून आली होती. यादरम्यान धवनने मितालीबरोबरच्या लग्नाची अफवा असल्याचे स्पष्ट केले. शिखर धवन म्हणाला की, ही एक विचित्र अफवा आहे.यादरम्यान शिखरने मितालीला क्रिकेट आणि तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक प्रश्न विचारले. यानंतर शिखरने धवने या शो दरम्यान ऋषभ पंतचे कौतुक केले.शिखर धवननेही शोदरम्यान ऋषभ पंतचे कौतुक केले. धवन म्हणाला, "अपघातानंतर त्याने ज्या प्रकारे स्वत:ला हाताळले आहे त्याचे मला कौतुक करायला आवडेल. त्याने ज्या प्रकारे पुनरागमन केले आणि आयपीएलमध्ये खेळून भारतीय संघात स्थान मिळवले, ते अविश्वसनीय आणि आश्चर्यकारक आहे. त्याच्या शानदार पुनरागमनासाठी मी खूप आनंदी आहे. मला त्याचा अभिमान आहे.

### धवन ऋषभबद्दल काय म्हणाला?

अशात शिखर धवनने भारतीय महिला संघाची माजी कर्णधार मिताली राजबरोबरच्या त्याच्या लग्नाबाबत एक मोठा खुलासा केला आहे.धवन अजून काही आयपीएल सीझन खेळू शकतो, पण टीम इंडियात त्याचे पुनरागमन आता अशक्य दिसत आहे. तसेच भारतीय संघाची माजी कर्णधार मिताली राज सध्या डब्ल्यूपीएलमध्ये गुजरात जायंट्स संघात मार्गदर्शकाची भूमिका निभावत आहे. अलीकडेच ती शिखर धवनसोबत जिओ सिनेमाच्या 'धवन करेंगे' या शोमध्ये दिसली होती. या शोमध्ये धवनने मितालीबरोबरच्या लग्नाच्या अफवांवर खुलेपणाने प्रतिक्रिया दिया. शिखर धवन म्हणाला, मी ऐकले माझे मिताली राजशी लग्न होणार आहे, असे म्हणताच मिताली आणि धवन जोरजोरात हसू लागले.भारताचा अनुभवी फलंदाज शिखर धवनने स्वत:बद्दल एक रोचक खुलासा केला आहे.